<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १२८५/२०२५</u>
**निशाणी क्रमांकः– ११ खाली**
**अमित भाटीया व इतर वि. कोणीही नाही**

**अर्जदार तर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची शपथेवरील जबानी पुढे सुरू**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नावः– पंकज हरिनारायण मेहरा

**<u>सरतपास अर्जदार तर्फे वकील अतुल जोशी यांचे मार्फत सुरू</u>**

**०१.** सदर प्रतिज्ञापत्रातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिला असुन तो बरोबर आहे व तो वाचल्यानंतर मी त्यावर सही केली आहे. मी विरेंद्र मोहन भाटीया यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळुन पाहिली, ते बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.क्र. १२** देण्यात येते. मयत विरेंद्र भाटीया यांच्या नावावर असलेल्या नेरे येथील मालमतत्तेची मुळ खरेदीखत क्र.९९६८/२००६ मी सोबत आणले आहे व त्याची झेरॉक्स प्रत रेकॉर्डवर दाखल केली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळुन पाहिली, ते बरोबर आहे. त्यास **नि.क्र. १३** देण्यात येते. मयत विरेंद्र भाटीया व सुरेंद्र भाटीया यांच्या संयुक्त नावावर असलेल्या त्र्यंबकेश्वर येथील मालमतत्तेचा मुळ करारनामा क्र.१००९/२०२१ मी सोबत आणले आहे व त्याची झेरॉक्स प्रत रेकॉर्डवर दाखल केली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळुन पाहिली, ते बरोबर आहे. त्यास **नि.क्र. १४** देण्यात येते. मयत विरेंद्र भाटीया व गीता लुथरा यांच्या संयुक्त नावावर असलेल्या कर्जत येथील मालमतत्तेचे मुळ खरेदीखत क्र.५३६३/२०१२ मी सोबत आणले आहे व त्याची झेरॉक्स प्रत रेकॉर्डवर दाखल केली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळुन पाहिली, ते बरोबर आहे. त्यास **नि.क्र. १५** देण्यात येते.

**०२.** मयत विरेंद्र भाटीया यांच्या नावाने कॅनरा बँकेत असलेले बचत खाते क्र. ४६५२१०१००२९१५, आयसीआयसीआय बँक, शाखा नवी मुंबई, खारघर येथे बचत खाते क्र. १०३००१५१०७०२, स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा विले पारले

येथील संयुक्त बचत खाते क्र. १०५४९९९३२९४ व स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा विले पारले येथील बचत खाते क्र. १०५४९८८७७०८ या खात्यांचे मुळ पास बुक सोबत आणले आहे व त्यांच्या झेरॉक्स प्रती रेकॉर्डवर दाखल केल्या आहेत. मुळ वरून झेरॉक्स पडताळुन पाहिल्या, त्या बरोबर आहेत. त्यांना अनुक्रमे **नि.क्र. १६ ते १९** देण्यात येते.

**०३.** मयत विरेंद्र भाटीया यांनी केलेले मुळ मृत्युपत्र मी आज रेकॉर्डवर दाखल करीत आहे. सदर मृत्युपत्रामध्ये विरेंद्र भाटीया यांनी एक्सीक्युटर मला बनवत असल्याबाबत मृत्युपत्र बनविण्याआधी मला सांगितले होते. त्यात नमुद मालमत्तांबाबतही त्यांनी मला सांगितले होते. सदर मृत्युपत्र त्यांनी माझे समक्ष तयार केलेले नाही. तसेच त्यावर माझी सहीदेखील नाही. मृत्युपत्रास '**अर्टीकल अ**' देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.01.07 15:37:59 +0530

**(आर. वाय.खंडारे)**

ठिकाणः पनवेल
दिनांकः– ०७/०१/२०२६.

५वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल